# प्रेस नोट ता. २९/१०/२०२०

## कारच्या काचा फोडुन चोरी करत महाराष्ट्र व गोवा राज्यात धुमाकुळ घालणारी टोळी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक, १३ गुन्हे उघड

### एकुण १२,७७,६२०/- रु. किं. चे एकुण १८ लॅपटॉप व इतर मुद्देमाल जप्त

दि. ०६/१०/२०२० रोजी दुपारी ०२:३० ते ०२:४५ वा चे दरम्यान बेंगलोर-मुंबई हायवेच्या सर्व्हिस रोडवर बिटवाईज कंपनी जवळ रोडवर फिर्यादी नामे मिलींद वेदव्यास राळेगावकर, वय-४८ वर्षे, धंदा- बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर रा- ए/५०५, तिर्थ टॉवर, विबजॉअर शाळेजवळ, सुसगाव, पुणे यांनी त्यांची होंडा सिटी कार लॉक व पार्क करुन ठेवली असताना अज्ञात इसमांनी सदर गाडीची काच फोडुन मागील सीटवर ठेवलेली रोख ५०,०००/- रु असलेली बॅग चोरुन नेल्याने हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-५४०/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

मागील एक ते दिड वर्षात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत गाडयांच्या काचा फोडुन होणाऱ्या चोऱ्यांचे प्रकार मोठया प्रमाणात घडल्याने मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, श्री सुधिर हिरेमठ साहेब, यांनी सर्व गुन्हे शाखेचे अधिकारी यांना या प्रकारच्या गुन्हयांना प्रतिबंध करुन घडलेले गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेश दिल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व अंमलदारांनी सदर गुन्हयाचा तपास सुरु केला असता **पोना/ वासुदेव मुंढे आणि पोशि/ आदिनाथ ओंबासे** यांनी सदर कंपनीच्या परिसरातील सी.सी.टि.व्ही तपासले असता गुन्हा झाले वेळी सदर परिसरात एक संशयित मोटारसायकल फिरत असल्याचे आढळुन आले. तेव्हा सदर स्टाफने सी.सी.टि.व्ही व्दारे बरेच अंतर सदर मोटारसायकलचा माग काढुन अंदाजे १०० पेक्षा जास्त सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासुन मोटारसायकलचा नंबर निष्पन्न केला. सदर क्रमांका व्दारे मोटारसायकल धारकाचा शोध घेतला असता सदरची मोटारसायकल ही आरोपी नामे **गणेश उर्फ नाना माणिक पवार** हा वापरत असल्याची व तो मुंबई येथिल रेकॉर्ड वरील गुन्हेगार असल्याची माहिती मिळाल्याने सहा.पो.नि देशमुख यांनी पथकासह जावुन त्यास रबाळे, नवी मुंबई परिसरातुन ताब्यात घेतले. त्यास ताब्यात घेतलेवर आरोपी नामे **बबन काशिनाथ चव्हाण, वय-३९ वर्षे, रा-तिन्हे तांडा, ता-उत्तर सोलापुर, जि-सोलापुर व बसु जगदीश चव्हाण, वय-४५ वर्षे, रा- सर्व्हे नंबर-८६, बिराजदरा नगर, ससाणे नगर रोड, सुरक्षा नगर, हडपसर, पुणे** हे त्याचे साथिदार असल्याची माहिती मिळाल्याने तात्काळ एक पथक हडपसर येथे पाठवुन बसु चव्हाण यास ताब्यात घेण्यात आले. तसेच मुंबई येथे गेलेले पथक तसेच थेट सोलापुरात जावुन आरोपी नामे बबन चव्हाण हा शेतात लपुन बसलेला असताना स्थानिक पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेतले. सदर तिन्ही आरोपींना गुन्हे शाखा युनिट-४ चे कार्यालयात आणुन कसुन चौकशी करता नमुद तिन्ही आरोपीतांनी त्यांचे इतर दोन साथिदार **नामे राजेश प्रकाश चव्हाण, वय-३५ वर्षे रा-अंबुजवाडी, मालवणी, मालाड, मुंबई, मारुती मानी पवार, वय-४० वर्षे, रा- पाणी ईपरगा तलाव, ता-उत्तर सोलापुर, जि-सोलापुर** यांचे सह नमुद गुन्हया व्यतिरिक्त त्यांनी पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसरात मागील एक-दीड वर्षात २५ ते ३० गाडयांच्या काचा फोडुन लॅपटॉप, रोख रक्कम व इतर साहित्याची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीनी चोरी केलेले लॅपटॉप हे सोलापुर जिल्हयात विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने सोलापुर येथे जावुन त्यांचे कडुन माल विकत घेणारे इसम नामे **अमोल साहेबराव गुंड रा. शिवनी ता. उत्तर सोलापुर जि. सोलापुर व सुलेमान याकुब तांबोळी रा. १२४, विष्णु नगर, कुमठा नाका, सोलापुर** यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन १८ महागडे लॅपटॉप ०३ वाय-फाय डोंगल जप्त करण्यात आले आहे. तसेच बरेच लॅपटॉप हे आरोपींचे फरार साथिदार नामे राजेश चव्हाण व मारुती पवार यांनी मुंबई मध्ये विक्री केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**नमुद आरोपी कडुन डेल कंपनीचे ०७, एच पी कंपनीचे ०५, लिनोव्हा कंपनीचे ०४, ॲपल कंपनीचे ०२ असे एकुण १८ लॅपटॉप, ०३ वाय-फाय डोंगल, ०१ कॅनॉन कंपनीची कॅमेरा लेन्स, लॅपटॉपच्या ०७ रिकाम्या बॅग, ०२ मोटारसायकल, गाडीचे काच फोडण्यासाठी वापरत असलेले साहित्य असा एकुण १२,७७,६२०/- रु किं चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्यांचे कडुन पिंपरी-चिंचवड व पुणे आयुक्तालयातील खालील एकुण १३ गुन्हे उघड झाले आहेत.**

१) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ५४०/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
२) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ८४/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
३) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ५३/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७

४) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ९६/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
५) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ८३/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
६) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ४९/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
७) हिंजवडी पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ९६४/२०१९ भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
८) वाकड पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ४१/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
९) वाकड पोलीस ठाणे- गु.र.नंबर- १९४/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
१०) वाकड पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ७०६/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
११) बंडगार्डन पोलीस ठाणे- गु.र.नंबर- ६४/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
१२) हडपसर पोलीस ठाणे- गु.र.नंबर- १४९१/२०२० भा.दं.वि.कलम-३७९, ४२७
१३) हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर लॉस्ट रिपोर्ट नंबर- २५१५९ दि. १४/१२/२०१९ (ऑन लाईन तक्रार)

सदरचे तिन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन आरोपी नामे गणेश पवार याचे विरुद्ध मुंबई शहर येथे एकुण २४ गुन्हे दाखल असुन तो डिसेंबर २०१९ मध्ये ख्रिसमस कालावधीत त्याचे इतर साथिदारांसह गोवा राज्यात वास्तव्यास असल्याचे निष्पन्न असुन तेथेही त्यांनी अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे सांगितले असुन त्याबाबत गोवा राज्यातील पोलीसांशी संपर्क साधला असुन पुढील तपास करत आहे. आरोपी नामे बसु चव्हाण याचे विरुद्ध मुंबई शहर व पुणे शहर येथे एकुण १४ गुन्हे नोंद असुन त्यास मुंबई शहरातुन तडीपार केले नंतर तो पुणे शहरात वास्तव्यास आला होता. तसेच दोन्ही पाहिजे आरोपी नामे राजेश पवार व मारुती चव्हाण यांचे विरुद्ध अनुक्रमे २७ व ०३ गुन्हे दाखल आहेत.**आरोपींकडे मिळुन आलेल्या १८ लॅपटॉप पैकी ०६ लॅपटॉपचे मुळ मालक मिळुन आले असुन १२ लॅपटॉपचे मालक अद्याप मिळुन आले नाही. तरी गाडीची काच फोडुन लॅपटॉप चोरी गेल्याचा प्रकार असल्यास गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड येथे संपर्क साधण्याबाबत आवाहान करण्यात येत आहे.**

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्री. राजाराम पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. आवटे, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, तसेच तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखेचे नागेश माळी, राजेंद्र शेटे, अतुल लोखंडे यांनी केली आहे.**

